जा.क्र./नसका/स्थायी/सिआर-08/2019
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांकः- 09.08.2019

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**स्थायी समितीच्या सभेची सूचना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड चे प्रकरण-2 मधील नियम क्र. 3 (अ) अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र.3 (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **दिनांक 14.08.2019 रोजी दुपारी 03.00** वाजता नांवाशमनपा स्थायी समिती सभागृह येथे भरविण्यात येत आहे तरी या सभेस उपस्थित राहावे ही विनंती.

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**(खान फारुख अली अलीयाज खान)**
**सभापती,**
**स्थायी समिती,** नांवाशमनपा, नांदेड.

**प्रति,**
**श्री / श्रीमती ------------------------------------------**
**सदस्य / सदस्या, स्थायी समिती,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**विषय क्रं. 01**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/क्षेकाक्रं.4/613/2019 दिनांक 12.07.2019 अन्वये भारतीय प्रजासत्ताक दिनांचा 69 वा वर्धापन दिन दिनांक 26 जानेवारी 2019 साजरा करणे बाबत.

मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे पत्र दि. 14.01.19, 15.01.19, 19.01.19 अल्प मुदतीची निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/ क्षेकाक्रं.4/1345/19 21.01.19 जा.क्रं. क्षेकाक्रं.4/1369/19 दिनांक 23.01.19 अन्वये परि.क्रं.5 अन्वये लागणारे खर्चास मान्यता देऊन कार्यारंभ आदेश देणे बाबतच्या आदेशान्वये दिनांक 26.01.19 रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनाचा 29वा वर्धापन दिन समारंभ पोलीस मुख्यालय कवायत मैदान वजिराबाद नांदेड येथे 26 जानेवारी 19 रोजी सकाळी 9.15 वाजता साजरा करणे करिता दोन शामियाने, अतिमहत्वाच्या व्यक्तीसाठी सोफासेट, टी पॉय व इतर मान्यवरांसाठी पुरेशा खुर्च्याची व्यवस्था तसेच मा. पालकमंत्री महोदयांच्या भाषणासाठी डायसची व्यवस्था करणे बाबत उपआयुक्त प्र. मनपा नांदेड व पोलीस यंत्रणेच्या देखरेखीखाली सदरील व्यवस्था करणेसाठी परि.क्रं. 5 अन्वये कमी दराच्या तिन निविदा प्राप्त झाल्या यामध्ये श्री सहयोग सेवा जुना मोंढा यांचे सर्वात कमी दराचे दरपत्रक असल्यामुळे संबंधीतांचे देयक क्रं. 30 दि. 26.01.19 अन्वये उक्त प्रमाणे व्यवस्था करणेकरिता संबंधीतांना आदेश देण्यात आले होते.

मे. सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांचे देयक क्रं. 30 दि. 26.01.19 अन्वये उक्त प्रमाणे आवश्यकती व्यवस्था करुन केलेल्या कामाच्या खर्चाचे देयक रुपये 1,84,250/- (अक्षरी रुपये एक लक्ष चौ-यांशी हजार दोनशे पन्नास फक्त) चे सदर केलेले आहे सदरचे देयक श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांचे नांवे अदाई करण्याकरिता झालेल्या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता अधिनियम 1949 चे कलम 73 क नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता सदरील आदेशाव्दारे देण्यात आली त्यास मान्यतेस्तव स्थायी समिती सभेसपुढे सादर.

सदर खर्च सालसन 2019-20 च्या मनपा अंदाजपत्रकातील संबंधीत लेखा शिर्षकातुन करण्यात यावा.

**विषय क्रं. 02**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्दीत **प्रभाग क्रं. 19 मध्ये श्री थोरात ते उमरजकर यांचे घर ते आंबेडकरवादी मिशन पर्यंत तसेच लातुर मुख्य रस्ता आर.सी.सी. नाली करणे व श्री बि. सी. कांबळे ते श्री दरबारे यांचे ते वाघमारे यांचे घरा पर्यंत सी.सी. रस्ता करणेसाठी** अंदाजीत किमंत रुपये 28,00,000/- करिता निविदा मागविण्यात येवुन पठाण मोईज अहेमद खान कंत्राटदार नांदेड यांनी कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/14325 /2019 दिनांक 05.01.2019 अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.

परंतु सदर ठिकाणी रस्ता कच्या स्वरुपाचा असुन ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम अद्याप करण्यात आले नसल्यामुहे सदर ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे अत्यंत आवश्यक आहे.

करिता नव्याने ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी लागणा-या वाढीव खर्चास रुपये 3,97,600/- यास प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठी व सदर काम पठाण मोईज अहेमद खान कंत्राटदार नांदेड यांचेकडून करुन घेण्यासाठी प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 03**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीमध्ये मध्यवर्ती बस स्थानका समोरील उड्डान पुलाखालील दक्षिण बाजुचे वाहनतळाचा मक्ता तीन वर्षासाठी प्रती वर्ष 10 टक्के नैसर्गिक वाढ या प्रमाणे रुपये 7,12,250/- एवढी सरकारी बोली ठेवुन दिनांक 26.06.19 रोजी वृत्तपत्रामध्ये जाहीर ई-लिलाव सुचना देण्यात आली व दिनांक 09.07.2019 रोजी ई-लिलाव घेण्यात आला सदर ई.लिलावामध्ये खालील ठेकेदारानी भाग घेता.

| अ.क्र. | लिलावधारकांचे नांव | बोली रक्कम |
|---|---|---|
| 01 | श्री मो. खालेद मो. इस्माईल | 7,19,750/- |
| 02 | श्री प्रल्हाद किशनराव रनविर | 7,17,250/- |
| 03 | श्री शेख मोहसीन शेख हबीब | 7,14,750/- |

वरील पैकी श्री मो. खालेद मो. इस्माईल यांची सर्वात जास्त बोली रुपये 7,19,750/- एवढी आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थीक हिताचा विचार करता सदर मक्ता देण्याबाबत प्रस्ताव स्थायी समितीच्या सभेसमोर निर्णयास्तव सादर,

**विषय क्रं. 04**

निविदा सुचना क्रं. 17847 दिनांक 08.03.2019 व्दारे दैनिक पुण्यनगरी विभागीय पातळी आणि दै. श्रमिक एकजुट व दै. गाववाला या वृत्तपत्रा मध्ये निविदा सुचना प्रसिध्द करुन बिएसयुपी योजना प्रकल्प 11 अंतर्गत ब्रम्हपुरी येथील शिल्लक मुलभुत सुविधांची कामे करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या.

उक्त निविदा सुचनेच्या अनुषंगाने खालील तीन कंत्राटदारांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | निविदेत नमुद केलेला दर | शेरा |
|---|---|---|---|
| 01 | कामारिकर कन्सट्रक्शन | 30% जास्त | L1 |
| 02 | जी. जे. कन्सट्रक्शन | 35.12% जास्त | L2 |
| 03 | पठाण मोईज | 36.33% जास्त | L3 |

बिएसयुपी योजनेच्या प्रकल्प 11 अंतर्गत ब्रम्हपुरी भागातील शिल्लक मुलभुत सुविधांचे कामासाठी **कामारिकर कन्सट्रक्शन हे** L1 निविदाधारक ठरल्यामुळे व त्यांनी निविदेत अंदाजपत्रक दरापेक्षा 30% जास्त दर नमुद केल्यामुळे सदर दर जास्तीचे असल्याने संबंधीतांना कार्यालयीन पत्र क्रं. बिएसयुपी/3019/19 दिनांक 01.07.2019 च्या अन्वये दिनांक 02.07.2019 रोजी सकाळी 11.00 वाजता दर कमी करण्यासाठी या कार्यालयात पाचारण करण्यात आले असता दर कमी करण्याच्या झालेल्या चर्चेनुसार संबंधीतांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराने काम करण्याचे मान्य करुन लेखी पत्राने कळविले आहे.

करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 क व ड अन्वये कामारिकर कन्सट्रक्शन यांची बिएसयुपी अंतर्गत ब्रम्हपुरी भागातील उर्वरीत मुलभुत सुविधांचे कामे करण्यासाठी रुपये 2,20,12,961/- रक्कमेची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव सादर.

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**(खान फारुख अली अलीयाज खान)**
**सभापती,**
**स्थायी समिती,** नांवाशमनपा, नांदेड.